
# क्रांतिज्योती
# सावित्रीबाई फुले



# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले


- **प्रकाशक:**

  **अभिव्यक्ती**

  अलका जोशी, सी – 4, मंत्री इस्टेट, सॅलिसबरी पार्क, पुणे – 411 037

- **मुद्रक:**

  आर.एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 411 030

- **पहिली आवृत्ती:** जानेवारी 2026



- **कॉपीराईट नाही**



**सहयोग मूल्य: ₹ 5/-**

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

(**जन्म:** ३ जानेवारी १८३१, नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा | **मृत्यू:** १० मार्च १८९७, पुणे)

## स्त्रियांची भीषण परिस्थिती

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाळण्यात असतानाच मुलींची लग्नं लावून दिली जात होती. लग्न म्हणजे काय, संसार म्हणजे काय—हे उमगायच्या आधीच जर नवरा मरण पावला, तर त्या कोवळ्या वयातील विधवेला जन्मभर काबाडकष्ट, अपमान आणि अवहेलना सहन करत संयुक्त कुटुंबात खितपत पडावे लागत. अशा स्थितीतच कुण्या पुरुष नातेवाईकाच्या वाकड्या नजरेची शिकार बनून गर्भ राहिला तर त्याचा सारा दोष पुन्हा या निष्पाप पोरीच्याच माथी मारला जायचा. मग तोंड लपविण्यासाठी त्या कोवळ्या पोरींना नदी-विहिरीत जीव देण्यापलीकडे दुसरा मार्गच नसायचा.

हे हाल कमी म्हणूनच की काय, ब्राह्मण समाजात या अशा मुलींचे सुंदर केस कापून तिला सोवळी करून विद्रूप करून टाकत होते. तीच्या मृत्यूनंतर तिला सती जाण्यास भाग पाडलं जायचे. शिक्षण नाही, वैयक्तिक मत जोपासण्याचा तर प्रश्नच नाही. अर्थात आपलं आयुष्य हे असं आहे, असा विचार करण्याचा विचारसुद्धा त्याकाळच्या स्त्रियांच्या मनात येऊ शकत नव्हता, असा तो काळ. त्या काळी घरातील कर्त्या पुरुषाच्या प्रत्येक कृतीला केवळ ते म्हणतात म्हणून 'मम' म्हणत सहकार्य करायचं, हेच त्या स्त्रीचं अस्तित्व.

शूद्र-अतिशूद्रांची स्थितीही तितकीच भयावह होती. आपली सावली ब्राह्मणांवर पडू नये म्हणून त्यांना अंग दुमडून चालावे लागत असे. थुंकीचा विटाळ सोवळ्या ब्राह्मणांना होऊ नये म्हणून गळ्यात मडके अडकवून फिरावे लागत असे. स्वतःच्या पावलांचे ठसे पुसून टाकण्यासाठी कमरेला झाडाची फांदी बांधून चालावे लागत असे. अज्ञान आणि उपासमार ही त्यांच्या जीवनाची पाचवीला पुजलेली होती. अशा काळात ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक परिवर्तनाचे कार्य केले आहे.

## दोन तेजस्वी ज्योतींचा संयोग

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव येथे झाला. सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातल्या नायगावचे खंडोजी नेवसे हे इनामदार पाटील. लोकप्रिय खंडोजींच्या पोटी जन्मास आलेल्या या सुंदर सशक्त लेकीच्या जन्माने

पाटलाचे घरच नव्हे, तर सारा गाव आनंदला. कष्टाळू आणि गरिबांचा कनवाळू अशा खंडोजींच्या घरचे सगळे चांगले संस्कार हुशार सावित्रीने लहान वयातच उचलले.

खंडोजींची ही एकुलती एक लेक ५ वर्षांची झाल्यापासूनच तिच्या आईला तिच्या लग्नाची काळजी लागली. कारण ६ वर्षांची मुलगीही त्या काळी घोडनवरी समजली जाई. पण आपल्या गुणी, सुस्वरूप मुलीला अनुरूप वर मिळाल्याशिवाय तिचे लग्न करायचे नाही म्हणून खंडोजींनी अनेक मागण्या नाकारल्या. मुलीचे वय वाढले म्हणून लोकांची बोलणीसुद्धा सहन केली. त्याचप्रमाणे जोतीराव या आपल्या हुशार, तेजस्वी मुलासाठी गोविंदराव आणि त्यांचा आईसारखा सांभाळ करणाऱ्या सगुणाबाई अनुरूप मुलगी शोधत होते. सगुणाबाईंच्या दूरच्या नात्यातली असल्याने सावित्री त्यांना माहीत होती. तिला पाहण्यासाठी मंडळी नायगावी आली.

आपल्या लेकीला अगदी अनुरूप वर सापडल्याबरोबर खंडोजी पाटलांनी आणि साऱ्या गावाने मोठ्या थाटामाटात सावित्री-जोतीरावांचा विवाह सोहळा पार पाडला. ते साल होते १८४० आणि त्या वेळी जोतीराव होते तेरा वर्षांचे व सावित्रीबाई होत्या नऊ वर्षांच्या. सावित्रीबाईचे सासरे गोविंदराव फुले हे मुळचे फुरसुंगीचे गोरे, परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येऊन राहिले व फुलांच्या व्यवसायावरून त्यांना 'फुले' हे आडनाव मिळाले.

## प्रेरक शक्ती सगुणाबाई

पुढच्या आयुष्यात जोतीराव आणि सावित्रीबाई या जोडप्याच्या हातून स्त्रियांच्या शिक्षणाचे आणि इतर सामाजिक जागृतीचे जे महान कार्य झाले त्या मागची मुख्य शक्ती होती सगुणाबाई क्षीरसागर. सगुणाबाई या नात्याने जोतीरावांच्या मावसबहीण. पण नऊ महिन्यांतच आईविना पोरक्या झालेल्या जोतीबांचा त्यांनी सांभाळ केला. शिक्षणाची आवड असणाऱ्या गोविंदरावांनी तल्लख बुद्धीच्या जोतीबांना 'चर्च ऑफ स्कॉटलंड' मिशनच्या शाळेत घातले. पण बहुजन समाजातल्या मुलाने शिक्षण घ्यावे, याचे सनातनांना वैषम्य वाटून त्यांनी गोविंदरावांना वाळीत टाकण्याची, मुलाला शिकवण्याचे धर्मबाह्य वर्तन हातून घडल्यामुळे पाप लागण्याची भीती घालून जोतीवांना शाळेतून काढायला लावले. आपल्या जोतीने खूप शिकावे आणि समाजाची सेवा करावी अशी त्यांची इच्छा होती. कलेक्टरांची चिट्ठी मिळवून जोतीबांना घेऊन त्या बुधवार वाड्यातल्या प्रसिद्ध शाळेत गेल्या आणि तिथे जोतीबांना प्रवेश मिळवून दिला. याचे श्रेय सगुणाबाईंच्या दक्षतेसच द्यायला हवे.

सावित्रीबाईंनाही आपल्याबरोबर शिकवावे असा त्यांनी जोतीबांकडे आग्रह

धरला. शेतावर काम करताना जेवणानंतरच्या विश्रांतीच्या काळात आंब्याच्या झाडाखाली जमिनीला पाटी बनवून ते त्यांना शिकवू लागले. सावित्रीबाई आणि सगुणाऊ दोघींनाही मिचेल बाईंनी शिकण्यासाठी आणि शिकवण्याचे शिक्षण देण्यासाठी नॉर्मल स्कूल (शिक्षक प्रशिक्षण शाळा) मध्ये प्रवेश दिला आणि दोघींनीही २ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. इ.स. १८४७ मध्ये त्या दोन्ही प्रशिक्षित शिक्षिका झाल्या.

## शैक्षणिक कार्याची सुरुवात

१ मे, इ.स. १८४७ रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागास वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही पहिली शाळा मध्येच बंद पडली. त्यानंतर १ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी भिडेवाड्यात जोतिराव आणि सवित्रीबाईंनी मुलींची शाळा सुरू केली. सगुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. या शाळेत सावित्रीबाई विनावेतन शिक्षिकेचे काम करू लागल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली. सावित्रीबाई या भारताच्या प्रथम महिला शिक्षिका आहेत.

पण त्या काळी शिक्षिकेचे काम करणे ही गोष्ट सोपी नव्हती. जोतीराव मुलींना शिक्षण देण्याचे एक ‘पातक’ (पाप) करत होते, त्याच्याच जोडीने मुलीच्या शाळेत शिकवायला जाण्याचे दूसरे ‘पातक’ सावित्रीबाईही करू लागल्यावर त्यांच्या छळाला पारावारच राहिला नाही. त्या शाळेत जाऊ लागल्या की त्यांना दगड धोंडे मारणे, अचकटविचकट शिव्या देणे, वेळप्रसंगी शेण अंगावर फेकणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे इ. प्रकार होत असत. पण हा सगळा जाच शांतपणे सोसून सावित्रीबाईंनी आपले शिकवण्याचे काम चालूच ठेवले.

एकदा तर त्यांच्यावर फारच कठीण प्रसंग आला. एक आडदांड इसम शाळेत जात असताना वाट अडवून उभा राहिला आणि शाळा बंद करतेस की तुझी अब्रूच घेऊ. अशी धमकी देऊ लागला. प्रसंग फार बाका. पण आपल्या कार्यावरच्या व जोतीरावांवरच्या निष्ठेने त्यांना धैर्य दिले. सावित्रीबाईंनी खाडकन दोन थपडा त्याच्या कानशिलात लगावल्या. सावित्रीबाईकडून प्रतिकार होईल ही अपेक्षाच नसलेल्या त्या धटिंगणाचे त्यांच्या तेजस्वी रूपाच्या दर्शनाने अवसानच गळाले आणि तो तोंड लपवून पळून गेला. तेव्हापासून या तेजस्वी कर्तव्यकठोर सावित्रीबाईच्या कुणीही वाटेस गेले नाही. पण गोविंदरावांचे कान फुंकून जोतीराव आणि सावित्रीबाईंना घराबाहेर काढण्यात मात्र सनातन्यांना यश आले. एका मुसलमान मित्राने – उस्मान

शेख यांनी त्या दोघांना आपल्या घरात राहण्यास जागा दिली. एवढेच नाही, तर स्वयंपाकास लागणारी जुजबी भांडीकुंडीही दिली.

शाळेत येणाऱ्या मुलींनाही असाच त्रास होई. पण वेळोवेळी पालकांना भेटून त्यांची समजूत काढण्याचे काम सावित्रीबाई करीत. त्यामुळे मुलींची संख्या वाढू लागली. इ.स. १८५१ मध्ये त्यांच्या शाळेतल्या मुलींची परीक्षा घेण्यात आली. त्या वेळी मेजर कँडी यांनी शेरा दिला की “शाळेतील मुलींची बुद्धिमता आणि प्रगती पाहून फार समाधान वाटले.” मुलींची शिक्षणातली प्रगती पाहून मुलांनाही शाळेत पाठवण्यात येऊ लागले. फुले दाम्पत्याने शाळा उघडण्याचा सपाटाच लावला.

फुले दाम्पत्याने १८४८ ते १८५२ या चार वर्षांच्या कालावधीत पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण परिसरात एकूण १८ शाळा काढल्या आणि त्या यशस्वीपणे चालवल्या. या शाळा चालवण्यासाठी त्यांनी अविश्रान्त परिश्रम केले. त्यांनी दिवस पाहिला नाही की रात्र पाहिली नाही, तहानभूक विसरून या दाम्पत्याने ह्या परोपकारी कृत्याचा पिच्छा न सोडता हा ज्ञानदानाचा यज्ञ अहोरात्र प्रज्वलित ठेवला. फुले दाम्पत्याचे हे कार्य म्हणजे या दाम्पत्याने घडवून आणलेला एक चमत्कार होता. कारण त्या काळात अशा शाळा चालविणे ही अशक्य कोटीतील गोष्ट होती.


*सावित्रीबाई आणि फातिमा शेख यांच्या शाळेतील दोन विद्यार्थिनींसह*

सावित्रीबाई फुलेंच्या खऱ्या अर्थाने सहकारी, सखी आणि सहशिक्षिका म्हणजे फातिमा शेख. या उस्मान शेख यांच्या बहिण. यांनाही चिखल, शेण, दगड, धोंडे यांचा मारा सहन करावा लागलाच असेल. त्या आपल्या देशाच्या पहिल्या मुस्लिम शिक्षिका. त्यांनीही सावित्रीबाईंप्रमाणे रीतसर शाळेत जाऊन शिकवण्याचे प्रशिक्षण घेतले होते.

## थोर शिक्षणतज्ञ

सावित्रीबाईंनी केवळ शिक्षिकेचेच काम केले नाही, तर शिक्षणशास्त्रातले अनेक मूलगामी विचार आपल्या अनुभवावरून मांडले. शाळेतल्या अनुभवातून आणि निरीक्षणातून त्यांनी अनेक शिक्षणशास्त्रविषयक निष्कर्ष काढले व ते अमलात आणले. “शूद्र अतिशूद्रांच्या मुलांचा शैक्षणिक विकास व्हायचा झाल्यास त्याच समाजातील शिक्षकांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.” त्या काळात असे शिक्षक

मिळणे अशक्य होते. म्हणून आधी त्या ज्या बुधवार पेठेतल्या मुलींच्या शाळेत शिकवीत तिथले शिकवण्याचे काम त्यांनी ब्राह्मण शिक्षकांवर सोपवले आणि "या हीन-दीन मुलांना मातेच्या ममतेने पोटाशी धरले पाहिजे, त्यांचे दुखणेखुपणे पाहिले पाहिजे, पोटाची सोय लावली पाहिजे" हे माहीत असलेल्या सावित्रीबाईंनी शूद्रातिशूद्रांसाठी काढलेल्या शाळेत शिकवण्याचे काम स्वतःकडे घेतले.

त्यांच्या सहकारी फातिमा शेख व त्या स्वतः यांचे शिकवणे उत्कृष्ट व मनापासूनचे असूनही चाचणीत जेव्हा श्रीमंत व ब्राह्मण मुलींच्या शाळेची प्रगती अधिक आहे असे दिसून आले तेव्हा त्यांनी असा सिद्धान्त मांडला की ज्या समाजातून व ज्या परिस्थितीतून मुली अगर मुले येतात त्याचा बरा-वाईट परिणाम संबंधित मुलामुलींच्या शिक्षणावर होत असतो. सावित्रीबाईंनी इ.स. १८५३ मध्ये मांडलेला हा सिद्धान्त आता सर्वमान्य झाला आहे. आपल्या शाळांमधल्या शिक्षिका प्रशिक्षितच असल्या पाहिजेत म्हणून सावित्रीबाई आणि जोतीबांनी एक नॉर्मल स्कूल काढले. ज्या काळात शिक्षण हवे की नको याचीच चर्चा चालू होती त्या काळात चांगल्या प्रकारे शिकवता येण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता ज्यांना जाणवली ते फुले दाम्पत्य निश्चितच द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ होते.

फुले दांपत्याने शाळा काढल्या, परंतु फक्त शाळांची जाळी विणीत ते बसले नाहीत. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यावयचे नव्हते, शिक्षणातून त्यांना समाजजागृती करावयाची होती. जुनाट रुढी-अंधश्रद्धा, जुन्या परंपरा, भोळ्या समजुती नाहीशा करावयाच्या होत्या. सामान्य लोक पशुतुल्य जीवन जगत होते, त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल याचा सावित्रीबाईंनी विचार केला होता. 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात त्या म्हणतात –

*शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा ।*
*शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा ॥*

मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मूलभूत विचार सव्वाशे वर्षांपूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या भारतातील थोर शिक्षणतज्ज्ञ होत. लोकांना माणूस बनविणे, लोकांना ताठ मानेने उभे राहायला शिकविणे, स्वत्व जपण्यास शिकविणे आणि त्याहीपलीकडे माणसांबद्दल प्रेम निर्माण करणे एवढा शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोण त्यांचा होता.

## महिला सेवा मंडळ

सावित्रीबाई फुले यांनी १८५२ मध्ये 'महिला सेवा मंडळ' नावाची संस्था स्थापन केली होती. या मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती जोन्स व सचिव सावित्रीबाई फुले होत्या.

या मंडळाच्या नेहमी बैठका होत असत व त्यामध्ये स्त्रियांच्या समस्या व त्यांचे निवारण करण्यासाठी चर्चा होत असे. येथे सर्वजाति-धर्मांच्या स्त्रिया येत असत. येथे हळदीकुंकू व तिळगुळाचा कार्यक्रमही केला जात असे. कोणत्याही प्रकारचा जातिभेद व पक्षपात न करता सर्वांना हळदीकुंकू लावले जाई व तिळगुळ वाटण्यात येत असे.

या मंडळातर्फे या मंडळाच्या सदस्य असलेल्या महिलांकडून खादीची सूतकताई करून त्याचे कापड तयार करून घेतले जात असे. या वस्त्रांची विक्री केली जात असे. या प्रकारे महिलांना काही उत्पन्न मिळत असे. अशाप्रकारे महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळत असे.

## महाराष्ट्रातले पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह

जरठ-कुमारी विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या बाळाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भ्रूणहत्या करत. या समस्येवर उपाय म्हणून सावित्रीबाई आणि जोतीबांनी २८ जानेवारी १८५३ रोजी 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना केली. आपल्या घराजवळच्याच उस्मान शेख यांच्या बखळीत (मोकळ्या जागेत) त्यांचे कार्य चालू झाल्याची जाहिरात केली. ती अशी:

*विधवा भगिनींनो, अज्ञातपणे वाकडे पाऊल पडून गर्भ राहिला असेल तर तिने या गृहात येऊन सुरक्षितपणे बाळंत व्हा. बाळंतिणीचे नाव गुप्त राखण्यात येईल.*
*हवे असल्यास मुल घेऊन जा किवा  नको असल्यास ठेवून जा.*
*हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील, त्याचा सांभाळ आम्ही करू.*

अशी जाहिरात करण्याचे धैर्य सावित्रीबाई आणि जोतीराव यांच्यासारखे खंबीर व क्रांतिकारक सुधारकच दाखवू शकतात. कारण या बाबतीत जे सामाजिक परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे त्यासाठी करावयाचा आचार त्यांनी पूर्ण विचारांतीच ठरवलेला असतो. महाराष्ट्रातले हे पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह होय. या 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'तल्या मुलांची सावित्रीबाई किती काळजी घेत हे पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

"जोतीरावांच्या पत्नी सावित्रीबाई त्या गृहातल्या मुलांची अविरतपणे

वात्सल्याने सेवा करीत. लालनपालन करीत. त्यांना स्वतःला अपत्य नव्हते. तथापि या माउलीने आपल्या दयाळू, उदार स्वभावाला अनुसरून त्या अर्भकांचे अत्यंत प्रेमाने आणि वात्सल्याने संगोपन केले." या गृहातल्या कामाबद्दल लोकहितवादी, नवरंगे, मामा परमानंद या सुधारकांनीही चांगले उद्गार काढलेले आहेत.

## विधवा पूर्नविवाह

२५ जुलै १८५६ रोजी ब्रिटिशांनी विधवा विवाह कायदा अंमलात आणला. त्यामुळे विधवांना पुर्नविवाहाचा हक्क प्राप्त झाला. परंतु समाजामध्ये विधवा विवाह होत नव्हते. म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी विधवा पूर्नविवाहासाठी समाज जागृती केली. त्यांच्या प्रयत्नाने पुण्याच्या गोखले बागेत शेणवी जातीत पहिला विधवा पुर्नविवाह १८६४ मध्ये घडवून आणला होता.

सीताराम जबाजी आल्हाट हे म. ज्योतिबा फुले यांच्या दुकानात काम करीत होते. ते विधूर होते. त्यांचा पुर्नविवाह सावित्रीबाईनी त्यांची मैत्रीण बजुबाई ग्यानोबा निंबाळकर या विधवा स्त्रीसोबत २५ डिसेंबर १८७३ रोजी सत्यशोधक पध्दतीने लावून दिला. विधवा स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी सावित्रीबाई यांनी पुर्नविवाह संस्था स्थापन केली होती. दर १५ दिवसांनी सभा घेतली जात असे आणि त्यात स्त्रियांचे प्रश्न, शिक्षण, छळ या मुद्यांवर चर्चा होत असे.

## कर्त्या समाजसुधारक

त्या काळात विधवांची स्थिती भयानक होती, हे तत्कालीन आकडेवारीवरून लक्षात येईल. सन १८९१ च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्रात केवळ शून्य ते चार वर्षे वयाच्या विधवा झालेल्या, आईचे स्तनपानही न सुटलेल्या शैशवावस्थेतील निरागस, कोमल बालिकांची संख्या १३,८७८ अशी होती. धर्माच्या नावाखाली रुढी-परंपरा यांनी स्त्रियांचे भावविश्वच उद्‌ध्वस्त करून टाकले होते.

समाजात बालविवाह, जरठविवाह ह्या चाली सर्रास रुढ होत्या. हुंडा देऊ न शकणारा एखादा अगतिक बाप आपल्या सात-आठ वर्षांच्या कोवळ्या मुलीस साठ-सत्तर वर्षांच्या एखाद्या वृद्धाच्या गळ्यात बांधून मोकळा होई तेव्हा –

*अण्णा मी तुमची लाडकी । का करिता मला बोडकी ॥*

असा पोटच्या मुलीने फोडलेला टाहो त्या जन्मदात्या पित्यास ऐकू जात नसे.

*लेकीचा जन्म । जन्म घालून चुकला ॥*
*बैल घाण्याला जुंपला । जन्मवैरी ॥*
*लेकीचा जन्म । नको देऊ सख्याहरी ॥*

अशी स्त्रीजन्माची कर्मकहाणी होती.

सावित्रीबाई या केवळ बोलघेवड्या सुधारक नव्हत्या, तर आपल्याला पटलेला सामाजिक सुधारणेचा विचार त्यांनी अमलात आणला. सावित्रीबाईंना मूलबाळ नव्हते. जोतीबांनी ज्या काशीबाईस वाचवले तिच्या पोटी इ.स. १८७३ मध्ये मुलगा जन्मास आला. या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. हे मूल कोणाचे याचा काहीही पत्ता नसताना सावित्रीबाई व जोतीरावांनी या मुलाला अतिशय प्रेमाने वाढवले. त्याचे नाव यशवंत ठेवले. आपले सामाजिक कार्याचे व्रत या मुलाने पुढे चालवावे म्हणून त्याला डॉक्टर केले.

आजही प्रत्येक स्त्रीला मातृत्व श्रेष्ठ वाटते. जर स्वतःला मूल नसेल तर दाम्पत्य आपल्याच नात्यातल्या किंवा कुलाने श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीचे अपत्य दत्तक घेतात. आजकाल तर काय ‘सरोगसी’चं पेव फुटलं आहे. या परिप्रेक्ष्यात सावित्रीबाई यांना एक पत्नी, एक स्त्री म्हणून अभ्यासताना प्रकर्षाने जाणवते की, त्या केवळ आणि केवळ एक माणूसच होत्या. आता हेच बघा, दुसऱ्या जातीच्या विधवेच्या मुलाला, तेही त्या विधवेवर झालेल्या अधम अत्याचारातून ते मूल जन्माला आले असताना, दत्तक घ्यायचा विचार आजही कोणी करेल का?

*निर्मिके निर्मिला मानव पवित्र । कमीजास्त सूत्र बुद्धीमध्ये ।*
*पिढीजात बुद्धी नाही सर्वामधीः । शोध करा आधी पुर्तेपणी ।*
*धर्म राज्य भेद मानवा नसावे । सत्याने वागावे ईशापाशी ॥*

जोतीरावांचा हा जातिभादातीत सत्य धर्म पूर्णपणे पटलेल्या सावित्रीबाईंनी आपल्या यशवंताचा विवाह जातीबाहेरच्या मुलीशी लावून देऊन महाराष्ट्रातला पहिला अंतरजातीय विवाह घडवण्याचा मान मिळवला. तीव्र विरोध करूनही हा विवाह झालाच म्हणून सनातनांच्या मात्र अंगाचा तिळपापड झाला. “या महापापाचे प्रायश्चित्त भोगावे लागेल” वगैरे शिव्याशाप ते देत राहिले. पण या विवाहाने काहीही अशुभ अगर अमंगल घडले नाही.

अठराव्या शतकामध्ये सावित्रीबाईंनी दाखवलेली संवेदनशीलता, धाडस मनाला प्रेरणा देते. गणेश नावाचा एक ब्राह्मण गावोगावी पंचांग सांगून उदरनिर्वाह करत होता. त्याचे गावातल्या सारजा नावाच्या त्याकाळच्या तथाकथित अस्पृश्य जातीच्या मुलीवर प्रेम जडले. सारजाला त्याच्यापासून दिवस गेले. ती सहा महिन्यांची गरोदर राहिली. त्याचा बोभाटा झाला. गावातील काही दुष्टांनी दोघांना भरपूर मारपीट केली आणि मारत-मारत गणेश आणि सारजाची भयंकर मिरवणूक काढली. मिरवणुकीनंतर त्या दोघांना ठार मारण्याची तयारी होती.

त्या दोघांना ठार मारणार, इतक्यात... इतक्यात सावित्रीबाई पुढे आल्या. त्यांनी सरकारी कायद्याचे भय दाखविले. "हे दोन खून तुम्ही करणार आहात आणि त्याचे भयंकर परिणाम तुम्हाला कायद्याने भोगावे लागतील," असे धमकावले. त्यावेळी गणेशला आणि सारजाला ठार मारणाऱ्या लोकांनी असा निर्णय दिला की, "आम्ही यांना ठार मारणार नाही, पण या भटुकड्याने (गणेशने) आणि या महारणीने (सारजाने) हे गाव सोडून जावे." अर्थात, त्या दोन प्रेम करणाऱ्या जीवांनी हे मान्य केले. या गणेश आणि सारजेला मृत्युदंड होणार होता, तो झालाही असता. पण त्यांचा जीव वाचला, तो साहसी, धैर्यशील आणि माणसाला केंद्रबिंदू मानून रूढी-परंपरांचा विचार करणाऱ्या सावित्रीबाई फुलेंमुळे.

## काळापुढे धावणारी स्त्री

नायगावहून पुण्यास जोतीरावांना लिहिलेल्या दिनांक १०-१०-१८५६ च्या एका पत्रात त्या म्हणतात, "पुण्यात आपल्या विषयी दुष्टाचार माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही (नायगाव) आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सदासर्वकाळ कामात गुंतावे. भविष्यातले यश आपलेच आहे." सावित्रीबाईंचे हे विचार पाहता सावित्रीबाईंच्या प्रेरणेत कस कसा होता आणि त्यात केवढे सामर्थ्य होते याचा प्रत्यय येतो.

जोतीरावांचे निधन १८९० साली झाले. निधनसमयी अंत्ययात्रेच्या वेळी जोतीरावांचे भाऊबंद समस्त फुले मंडळी आडवी आली. दत्तकपुत्र यशवंत हे कडू बेणे! त्याला प्रेतयात्रेपुढे टिटवे (मर्तिकाचे मडके) धरू देण्यास फुलेमंडळींनी एकजात विरोध केला. त्या प्रसंगी सावित्रीबाईच्या धैर्याचा कस लागला. उरावर धोंडा ठेवून बाईनी प्रेतयात्रेपुढे हातात टिटवे धरले. सावित्रीबाईच्या एका बाजूस यशवंत, दुसऱ्या बाजूस गजानन (जोतीरावाचा आप्त) अशी अंत्ययात्रा स्मशानभूमीवर पोहोचली.

विचाराने आणि आचाराने ही स्त्री काळाच्या कित्येक दशके-शतके पुढे गेली होती; या क्रांतिज्योतीच्या व्यक्तिमत्त्वातील विचारांच्या ज्वाळा किती तीव्रतेने धगधगत होत्या, याची जाणीव करून देण्यासाठी वरील घटना पुरेशा आहेत. १८५० ते १८९० या कालखंडात सुधारणांचा जो रथ अंधश्रद्धा, रुढी परंपरांच्या काट्याकुट्यांच्या, खाचाखळग्यांच्या, डोंगरकपाऱ्यांच्या मार्गावरून धावत होता, त्या कृतिनिष्ठ सुधारणा रथाचे एक चाक होते महात्मा जोतीराव फुले तर दुसरे चाक होते सावित्रीबाई जोतीराव फुले.

## सत्यशोधक समाजाचे कार्य

२४ सप्टेंबर इ.स.१८७३ रोजी महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या कार्यात स्त्रियांचे संघटन, जनजागृती आणि नेतृत्व सावित्रीबाई फुले यांनीच पुढाकार घेऊन केले. सावित्रीबाई फुले यांच्यासोबत अनेक स्त्रिया सत्यशोधक समाजात सक्रिय होत्या. ***'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥'*** हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली.

२८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा जोतीराव फुले यांचे निधन झाले. त्यानंतर सत्यशोधक समाजाच्या कार्याची जबाबदारी सावित्रीबाई फुले यांनी पुढे नेली. १८९३ मध्ये पुण्याजवळ सासवड येथे सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. या परिषदेत सावित्रीबाई फुले यांनी नेतृत्व केले. आपल्या भाषणांतून त्यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व गरिबांवरील अन्यायावर प्रखर टीका केली. त्यांनी ढोंग्यांविरोधात संघर्ष केला, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला आणि सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून गरीब, शोषितांविरुद्ध होणाऱ्या अन्यायाविरोधात जनजागृती केली. पण हे सर्व त्या पतीच्या पावलावर पावूल टाकून अंधपणे करीत नव्हत्या, तर त्या कार्यावर त्याची निष्टा होती, म्हणून पती निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे 'समता आंदोलन' पुढे चालू ठेवले.

## स्वतंत्र प्रज्ञेच्या कवयित्री सावित्रीबाई

सावित्रीबाई ह्या एक स्वतंत्र प्रज्ञेच्या कवयित्री होत्या. पण दुर्दैवाने त्यांची नोंद साहित्यिकांनीही घेतली नाही. १८५४ साली त्यांचा 'काव्यफुले' हा कविता संग्रह प्रसिद्ध झाला. तेव्हा त्या फक्त २३ वर्षांच्या होत्या. तर "बावनकशी सुबोध रत्नाकर" हा दुसरा काव्यग्रंथ १८९२ साली प्रसिद्ध झाला. यात प्रामुख्याने पेशवाईने केलेले अत्याचार आणि जोतिबांच्या कार्याचा समावेश आहे.

सावित्रीबाई शिकल्या तेव्हा त्याच्या ठायी असणाऱ्या कविमनाला जे काही आढळले ते त्यांनी कवितांच्या रुपात शब्दबद्धही केले. त्यांच्या कवितांमध्ये प्रेम, सुखदुःखं, वात्सल्य असे विषय तर होतेच पण मुख्यतः सामाजिक अन्याय हा विषय होता. त्यांच्या कविता म्हणजे सामाजिक कार्याचा आरसा आहेत, ज्यात शिक्षणाचे महत्त्व, स्त्रियांचे हक्क, आणि अंधश्रद्धा व जातीभेदावर प्रहार हे मुख्य विषय आहेत. त्यांनी फक्त कविताच नाही केल्या. तर त्या लेखही लिहायच्या, भाषणही द्यायच्या, मोरो विठ्ठल वाळवेकरांना प्रेरणा देऊन त्यांनी 'गृहिणी' मासिक सुरू केलं. त्यांनी स्त्री

प्रश्नांवर लेखही लिहिले. ‘मातोश्री सावित्रीबाईंचे भाषणे व गाणी’ या नावाने पुस्तकही १८९१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. त्याअगोदरच्या कालखंडात संत कवयित्रींनी ओव्यांमधून भक्तीच्या आणि मुक्तीच्याही काव्यरचना केल्या. पण जीवनविषयक वास्तव परिस्थितीवर, समानतेच्या वागणुकीची अपेक्षा व्यक्त करणाऱ्या कविता मराठी साहित्यात पहिल्यांदा सावित्रीबाईंनी लिहिल्या. आता त्यांची हिच कविता बघा ना.

*उठा बंधूंनो अतिशूद्रांनो, जागे होऊन उठा*
*परंपरेचि गुलामगिरी ही तोडणेसाठी उठा*
*बंधूंनो, शिकण्यासाठी उठा*
*गेले मेले मनु पेशवे, आंग्लाई आली,*
*बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली.*
*मुलाबाळांना आपण शिकवू, आपणसुद्धा शिकू*
*विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्मही शिकू*
*असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा*
*परंपरेच्या बेड्या तोडुनि शिकण्यासाठी उठा*

एका अर्थाने संत तुकारामांची भूमिका घेऊन त्यांचा वारसा चालवणारी ही कवयित्री आहे. सावित्रीबाईंच्या लेखनात व वागण्यात कुठेही आक्रमकता दिसत नाही. विद्रोह मात्र प्रखर आहे आणि विद्रोहाने पेटलेली मने पराभवाची तमा कधी बाळगत नाहीत. कदाचित त्यामुळेच त्यांचा लढा युगप्रवर्तक ठरतो.

*धोंडे मुले देती। नवसा पावती।*
*लग्न का करीती। नारीनर॥*

अंधश्रद्धा आणि कर्मकांडात बुडालेल्या सामाजिक स्थितीवर सावित्रीबाई स्पष्ट आणि थेट भिडणाऱ्या शैलीत प्रश्न उपस्थित करतात; असे प्रश्न की ज्यांची उत्तरे आजही समाजाला नीट देता आली नाहीत. त्यांनी त्यांच्या कवितेतून जशी दीन-दुबळ्यांच्या उन्नतीची अपेक्षा व्यक्त केली, तशीच ‘स्त्री’त्वाचा आत्मशोध घेणारी कविता लिहून स्त्री वर्गाला नव्या जाणिवांचे भान दिले. त्या काळात त्यांनी व्यवस्थेच्या विरोधात जो संघर्ष केला, तो संपूर्ण स्त्री वर्गासाठी अभिमानास्पद आहे.

## प्लेगच्या काळात सावित्रीबाईंचे कार्य

१८९७ मध्ये पुणे परिसरात प्लेगने थैमान घातले होते. काखेत गाठ येऊन तापाने फणफणून रोगी मरत होते. १८९६ – १९१७ या काळात एकट्या भारतात सुमारे १ कोटीपेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचे ऐतिहासिक नोंदी दर्शवतात. पुण्यात

जसजसं मृत्यूचं थैमान सुरू झाले तसे सामान्य लोकच नाही तर बडे राजकीय नेतेही पुणे सोडून दुसरीकडे राहायला निघून जात होते. पण साथीच्या काळात प्लेगशी झुंज देण्याचा निर्धार सावित्रीबाईंनी केला.

सावित्रीबाईंनी स्वतः आपल्या मुलाला दक्षिण आफ्रिकेतून तार करून बोलावून घेतलं. डॉक्टर यशवंत फुले ब्रिटिश मिलिटरीमध्ये नोकरी करत होते. रजा घेऊन आलेल्या यशवंतकडून परिस्थिती समजून घेऊन सावित्रीबाईंनी कामाला सुरुवात केली. रोग पसरू नये यासाठी काय उपाय व उपचार करावेत यासाठी प्रयत्न केले. त्याकाळात अस्पृश्यांच्या वस्त्यांमध्ये जाऊन प्लेगच्या रोग्याची माहिती घेत असत. प्लेगचा रोगी आढळल्यास त्यावर उपचार करण्यासाठी दवाखान्यात नेले जात असे. पुण्याजवळ घोरपडी येथील ज्ञानोबा ससाणे यांच्या माळरानावर झोपडीचं घर उभारून तेथे दवाखाना करण्यात आला. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व सावित्रीबाई या रोग्याला घेऊन येत व त्या दवाखान्यात उपचार केले जात असे. डॉ. यशवंत हे सर्व उपचार विनावेतन करीत असत.

मुंढवे गावात प्लेगची लागण एका अस्पृश्य मुलाला झाली असल्याची खबर सावित्रीबाईंना मिळाली होती. त्याला दवाखान्यात नेण्यास कोणीच तयार नव्हते. अकरा वर्षांच्या पांडुरंगाला त्यांनी चादरीत गुंडाळून पाठीवर घेतले. मुंढव्यापासून आठ किलोमीटर चालत, जातीपातीची पर्वा न करता त्या मुलाला उचलून त्यांनी ससाणेनगर गाठले. माळावरच्या दवाखान्यात येऊन त्याच्यावर उपचार केले. परंतू त्यावेळी सावित्रीबाई फुले यांनाही प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी त्यांनी देहत्याग केला. अखेरच्या क्षणापर्यंत सावित्रीबाई फुले या समाजसेवा करत होत्या.

आजूबाजूला अन्यायाचा काळोख पसरलेला असताना ‘सावित्रीबाई’ नावाचा तारा आजही आपल्या हृदयाला प्रकाशमान करत आहे आणि लढण्याची हिंमत देत आहे. विषमतेविरोधात त्यांनी केलेल्या  संघर्षातूनच आजच्या ‘सावित्रीच्या लेकी’ जन्माला आल्या आहेत. आजची गरज आहे—एकत्र येऊन सावित्रीबाईंनी दाखवलेल्या परिवर्तनाच्या दिशेने सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची. त्यांच्या लढ्याचा आणि विचारांचा वसा घेऊन आपण सातत्याने कार्यरत राहूया—हेच क्रांतिज्योती सावित्रीबाईंना खरे अभिवादन ठरेल.

# सावित्रीबाईंचे जोतीराव फुले यांना पत्र

सत्यस्वरूप जोतीबा स्वामी यांस,
सावित्रीचा शिरसाष्टांग नमस्कार

पत्रास कारण की,

माझ्या तबियतीत अनेकदा उलटापालटी होऊन ताळ्यावर आली आहे. या दुखण्यात भाऊने अपरिमित श्रम घेऊन माझी सेवा केली आहे. यावरून तो किती प्रेमळ आहे हे दिसून येते. मी परिपूर्ण दुरुस्त होताच पुण्यास येईन. काळजीत असू नये. फातिमास त्रास पडत असेल पण ती कुरकूर करणार नाही. अस्तू. येथे बोलण्यात बोलणे चालले असता असे घडले की, भाऊ म्हणाला, ‘तू व तुझा नवरा वाळीत असून तुम्ही उभयता महारमांगादी अंत्यजांकरिता जी कर्मे करिता ती पतित असून आपल्या कुळास बट्टा लावणारी आहेत. यास्तव सांगतो की, तुम्ही नवरा बायकोने जातिरूढीस अनुसरून व भट सांगेल त्याप्रमाणेच आचरण करावे.’ त्याचे बेलगाम व असंमजस बोलणे ऐकून आई खटकन उतरून काळवंडली. भाऊ तसा दयाळू पण कोत्या बुद्धीचा असल्यामुळे त्याने तुम्हास व मला दूषणे देऊन आपली निंदा करण्यास कमी केले नाही. आईस वाईट वाटले. ती त्यास रागे न भरता ऐकवणी करती झाली की, ‘तुला देवाने रसवंतीसारखी काया दिली असता तिचा असा दुरुपयोग करावा हे चांगले नाही.’ आईचे बोलणे ऐकून भाऊ उगा राहिला व लज्जा पावून मुकाट्याने बसून राहिला. मी त्याच्या मताचे खंडन करून बोलले, ‘भाऊ, तुझी बुद्धी कोती असून भट लोकांच्या शिकवणीने दुर्बल झाली आहे. तू शेळी, गाय यांना जवळ घेऊन कुरवाळतोस, नागपंचमीस विषारी नाग पकडून त्यास दूध पाजतोस.

महार-मांग हे तुझ्यासम मानव असता त्यास अस्पृश्य समजतोस त्याचे कारण काय?’ असा त्यास प्रश्न केला. ‘भट लोक सोवळ्यात असता तुझा विटाळ मानतात. तुला महारच समजतात.’ माझे बोलणे ऐकून तो लज्जित झाला व पुसू लागला, ‘महार-मांगांना तुम्ही कशासाठी शिकवता? याविषयी लोक तुम्हाला अपशब्द देऊन त्रास देतात हे मला ऐकवत नाही.’ मी त्यास इंग्रज लोक महार-मांगांसाठी काय काय करतात हे सांगून विद्याहीनता पशुत्वाची खूण आहे. भट लोकांच्या श्रेष्ठत्त्वास आधारभूत विद्या हीच होय. तिचा महिमा मोठा आहे. जो कोणी तिला प्राप्त करून घेईल त्याची नीचता दूर पळून उच्चता त्याचा अंगीकार करील. माझे स्वामी देव माणूस आहेत. त्यांची सर या देशी कोणाला येणार नाही. महार-मांगांनी शिकावे व

माणूस म्हणून जगावे या कारणास्तव भटगुळांशी झगडत खटाटोप करणारे जोतीबा स्वामी महार-मांगांना शिकवितात व मीही त्यांस शिकविते. पण त्यात अनुचित काय आहे? आम्ही मुलींना शिकवितो, बायांना शिकवितो, महार-मांगांना शिकवितो हेच ब्राह्मणांना अपायकारक होणार. या समजुतीच्या कारणास्तव ते आमच्या माणूस धर्माच्या कामास 'अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम्' करीत निंदा, कुटाळक्या करतात व तुझ्यासारख्याच्या मनात किल्मिष पेरतात.

'तुला स्मरत असेल, की माझ्या गुणग्राही नवऱ्याचा इंग्रज सरकारने एक समारंभ घडवून त्यात त्यांच्या कार्याचा गौरव करून, आदरसत्कार घडवून, दुर्मती दुर्जनास लाजविले. तुला मी खात्रीपूर्वक बोलते, माझा नवरा तुझ्यासारख्या वारकऱ्याप्रमाणे नुसते हरिनाम घेत वाऱ्या करीत नसून प्रत्यक्ष हरीचं काम करीत आहे. त्यास मी मदत करते. हे काम इतके आल्हाददायक होते, की त्यायोगे मला परमानंद होतोच होतो. त्याव्यतिरिक्त मनुष्याची सीमा दृग्गोचर होते.' माझे बोलणे भाऊ व आई एकाग्र चित्ताने ऐकत राहिली होती. भाऊ पश्चात्ताप पावून याचना करता झाला. आई बोलली, 'सावित्री, तुझा जिव्हेत सरस्वती नांदत असावी. तुझे ज्ञान ऐकून मी कृतार्थ झाले.' दोघांच्या उद्गारांनी मात्र माझे अंतःकरण समाधानाने भरून आले. यावरून तुमच्या ध्यानात येईल की, पुण्यात तुमच्याविषयी दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सदा सर्वदा कामात गुंतावे, भविष्यातले यश आपलेच आहे. अधिक उणे काय लिहावे.

कळावे, ही विज्ञापना.

**आपली सावित्री**

नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा

तारीख २९ ऑगस्ट १८६८

■ ■

## संदर्भ


- सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय – संपादक डॉ. मा. गो. माळी
- सावित्रीबाई जोतीबा फुले जीवनकार्य – शांता रानडे

# अभिव्यक्ती विषयी

आज देशात महिलांच्या स्थितीमध्ये खूप मोठा बदल झाला आहे. पूर्वीच्या काळी ‘चूल आणि मूल’ या चौकटीत कैद असलेल्या महिलांना संविधानाने सन्मान दिला. संविधानामुळेच महिलांना शिक्षण घेणं, घराबाहेर पडणं, नोकरी करणं शक्य झालं. म्हणूनच आज विविध क्षेत्रात त्या जबाबदारीच्या जागा सांभाळत आहेत. पण नुसतं बोलल्याने किंवा लिहिल्याने समाज बदलत नाही आणि समाज बदलल्याशिवाय, त्याची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता येऊ शकत नाही. एका बाजूला देशातील विशेषतः शहरांतील महिलांची स्थिती स्वातंत्र्याच्या काळापेक्षा खूपच सुधारली आहे हे जरी खरे असले, तरी अजूनही कधी आर्थिक, कधी सामाजिक, कधी सांस्कृतिक, तर कधी अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आणि बहुतांशी वेळेला घरगुती हिंसा, आणि इतर अत्याचाराच्या विरोधात महिला संघर्ष करतच आहेत.

आज आपण जी प्रगती केली आहे, हक्क आणि अधिकार मिळालेले आहेत ते आपल्या पूर्वीच्या बहिणींनी लढलेल्या संघर्षामुळेच शक्य झाले आहे. आपण या संघर्षाला पुढे नेण्याची, त्याला नव्या उंचीवर नेण्याची गरज आहे. केवळ कायदे करून सुरक्षा मिळणार नाही, मग ते कितीही कठोर असले तरी. जोपर्यंत समाजात पितृसत्ता अस्तित्वात आहे, तोपर्यंत महिलांवरील अन्याय आणि हिंसा कायम राहतील. एकटी स्त्री याचा मुकाबला करू शकत नाही. सर्वांनी मिळून उघडपणे विरोध करणे हाच यावरचा उपाय आहे. याला थांबवण्यासाठी एक मजबूत स्त्री-चळवळ उभी करायला लागेल, ज्यात स्त्रियांबरोबरच संवेदनशील पुरुषही सामील असतील.

‘अभिव्यक्ती’ हे असेच एक महिला संघटन (लोकायतची महिला आघाडी) आहे. आम्हीही तुमच्यासारख्याच सामान्य मुली आणि महिला आहोत. महिलांच्या मुक्तीविषयी जनजागृती करण्यासाठी आम्ही विविध कार्यक्रम आयोजित करतो— स्त्यावरील प्रचार मोहिमा, व्याख्याने, चित्रपट प्रदर्शन, गीते आणि रस्त्यावर पथनाट्ये—सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच निदर्शने, धरणे आणि मोर्चेही करत असतो.

सातत्याने स्त्री मुक्तीचा, स्त्री-पुरुष समानतेचा विचार निरनिराळ्या माध्यमातून समाजाच्या सर्व विभागांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करतो. समाजातील सर्व थरातील व वयोगटातील सुशिक्षित किंवा अशिक्षित स्त्रियांपर्यंत पोचण्याचे कलापथक हे एक प्रभावी माध्यम आहे. महाराष्ट्राच्या थोर परंपरेचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न आम्ही

करत असतो. छोटी छोटी पथनाट्ये, मुलगी झाली हो सारखं नाटक, आणि विशेषत्वाने गाणी ज्यात स्त्रियांच्या समस्या, त्या विरुद्ध पुकारलेला संघर्ष, त्यासाठी उगारलेले एकजुटीचे हत्यार आणि भविष्यासाठीची स्वप्ने आहेत अशांचा आम्ही वापर करतो. तसेच पोस्टर्सच्या माध्यमाचाही वापर करतो. स्त्रियांच्या प्रश्नावर फिल्म फेस्टिवल घेत असतो. याशिवाय आम्ही स्त्री मुक्ती यात्राही काढल्या.

हे सर्व करत असताना कौटुंबिक समस्येवर मदत मिळण्याच्या अपेक्षेने काहीजणी आम्हाला भेटायला येत. ही गरज लक्षात घेऊन आम्ही कौटुंबिक सल्लागार केंद्र चालू केले. काही विषयांवर आम्ही पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत.

आमचे कार्यक्रम केवळ महिलांसाठीच नाहीत, तर पुरुषांसाठीही आहेत. आम्हाला विश्वास आहे की पुरुषांनाही महिलांच्या मुक्तीबाबत जागरूक करणे आवश्यक आहे, कारण महिलांची मुक्ती केवळ महिलांनीच मिळवता येणार नाही; त्यासाठी संवेदनशील पुरुषांचाही सक्रिय पाठिंबा आणि सहभाग गरजेचा आहे.

तसेच, महिलांची मुक्ती अशा समाजात शक्य नाही, जिथे कामगार आणि श्रमिक वर्गाचे शोषण केले जाते. म्हणूनच, 'अभिव्यक्ती' समाजातील सर्व शोषित वर्गांशी—कामगार, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक—सहकार्याचे नाते जोडण्याचा प्रयत्न करते.

देशभरात अनेक महिला आणि पुरुष असा पुढाकार घेत आहेत. चला, आपणही आपले छोटेसे प्रयत्न सुरू करूया. एकमेकांपर्यंत पोहोचूया, समजून घेऊया, हातात हात घालून पुढे निघूया. जसजसे आपण पुढे जाऊ, तसतसे अधिकाधिक लोक आपल्या प्रवासात सहभागी होतील.

जर तुम्हाला वरील विचारांशी सहमती वाटत असेल आणि आमच्याबद्दल अधिक जाणून घेण्याची किंवा आमच्या उपक्रमांमध्ये सामील होण्याची इच्छा असेल, तर खालील पत्त्यांवर आमच्याशी संपर्क साधा.

अभिव्यक्ती, c/o लोकायत, कॅनेरा बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप, पुणे – 4

*(या पत्त्यावर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी 10 -12 या वेळेत अभिव्यक्तीची मीटिंग होते (फक्त महिलांसांठी), आणि दर रविवारी संध्या. 5 - 7 या वेळेत लोकायतची मीटिंग होते.)*

अलका जोशी: 90670 03838 मोनाली चं.अ.: 93701 95213

abhivyakti.pune www.lokayat.org.in

lokayat.india lokayatpune @lokayat

lokayat.india@gmail.com

# आमची निवडक प्रकाशने

| | |
|---|---|
| हे मला माहित हवं! *(मासिक पाळीविषयी)* | ₹ 5/– |
| मी नास्तिक का आहे *(लेखक: शहीद भगतसिंग)* | ₹ 5/– |
| विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद | ₹ 10/– |
| आरएसएस ला ओळखा *(लेखक: शम्सुल इस्लाम)* | ₹ 10/– |
| नोटाबंदी: काय कमावले? काय गमावले? | ₹ 10/– |
| देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे *(लेखक: प्रबोधनकार ठाकरे)* | ₹ 10/– |
| मुलगा म्हणजे? मुलगी म्हणजे? | ₹ 10/– |
| आपलं संविधान | ₹ 15/– |
| रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज | ₹ 15/– |
| भेदाभेद भ्रम अमंगळ | ₹ 15/– |
| सार्वजनिक विमा कंपन्यांचे (आणि बँकांचे) खाजगीकरण | ₹ 15/– |
| देशावर फॅसिझमचे संकट | ₹ 25/– |
| बेरोजगारी: कारणे आणि पर्याय | ₹ 30/– |
| इरादे कर बुलंद | ₹ 30/– |
| उठ माणसा: गाणी संघर्षाची | ₹ 30/– |
| आम्ही भारताचे लोक | ₹ 30/– |
| जागतिकीकरण की नवी गुलामगिरी? | ₹ 150/– |
| Public Sector Insurance and (&Banks) on Sale | ₹ 15/– |
| The Unemployment Crisis: Reasons and Solutions | ₹ 25/– |
| Spectre of Fascism | ₹ 25/– |
| Neoliberal Fascist Attack on Education | ₹ 25/– |
| We The People | ₹ 30/– |
| Globalisation or Recolonisation? *(Neeraj Jain)* | ₹ 200/– |
| Education under Globalisation | ₹ 275/– |
| Essays on Contemporary Indian Economy | ₹ 275/– |
| Nuclear Energy: Technology from Hell | ₹ 295/– |
| Union Budgets 2014 to 2024: An Analysis *(Neeraj Jain)* | ₹ 350/– |
| तर्कशील, वैज्ञानिक, समाजवादी विवेकानंद | ₹ 10/– |
| देश पर फ़ासीवाद का संकट | ₹ 20/– |
| बेरोजगारी का संकट: कारण और उपाय | ₹ 30/– |
| वैश्वीकरण या पुनःऔपनिवेशीकरण? | ₹ 150/– |

## सावित्रीबाईंची ओवी

पहिली माझी ओवी गं, सावित्रीच्या बुध्दीला
स्त्रियांच्या शिक्षणाचा, पाया तू घातला
अशिक्षित अडाणी तू, पतीपाशी शिकली
मुलींसाठी पहिली, शाळा तू काढली

दुसरी ओवी गाईली, तुझ्या गं धैर्याला
दगडगोटे खाऊनी, चालवली तू शाळा
घराबाहेर काढिले, गुंडांनी अडविले
धीराने तोंड दिले, सगळ्या त्रासाला

तिसरी माझी ओवी गं, तुझ्या मोठया मनाला
फसलेल्या विधवेचा, सांभाळ तू केला
अबला नि अनाथांचे, मायबाप होऊन
यशवंत बाळाला, दत्तक घेतला

चौथी ओवी गाईली, तुझ्या थोर हृदयाला
माणुसकीचा झरा ज्यातं, नित्य गं वाहिला
जोतिबांची सावली, नाही तू राहिली
सत्यधर्म प्रकाशात, तेजानं तळपली

दुःखितांच्या सेवेत, देह तू ठेविला
स्मरण तुझे करुनी, वसा मी घेतला
भगिनींना जागवीन, संघटीत करीन
ज्ञानज्योत लावीन, हेच तुला नमन



**- वसुधा सरदार**